जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४८२ दिनांक - ०१/०७/२०२३**

लोणीकंद पोलीस स्टेशन ,पुणे शहर

## लोणीकंद पोलीसांकडुन गावठी हातभट्टी केली उध्वस्त

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण भागामध्ये गावठी हातभट्टी दारुचे अवैध धंदे चालु असल्याच्या तक्रारी नागरिकांकडुन पोलीसांना प्राप्त झाल्या होत्या. अशा हातभट्टीच्या दारुमुळे जनसामान्याचे आरोग्य धोक्यात येवुन त्यांचे शरीरावर विपरीत परिणाम होत असल्याने सदर प्रकरणी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे श्री. रंजनकुमार शर्मा व मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ ४, पुणे शहर श्री. शशीकांत बोराटे यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.

दिनांक २९/०६/२०२३ रोजी लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजित काईंगडे यांनी पोलीस निरीक्षक श्री मारुती पाटील यांचे नेतृत्वाखाली सपोनि गोडसे व त्यांच्या तपास पथकाची एक टिम तयार त्यांना योग्य ते निर्देश देवुन मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने रवाना केले होते. त्यानुसार सपोनि गोडसे व त्यांच्या टिमने त्यांची वाहने एका विशिष्ट अंतरावर लावुन तेथुन सुमारे २ किमी पायी जावुन भावडी गावच्या हद्दीत हांडगर वस्तीजवळ इंद्रायणी नदीच्या पात्रामध्ये लावलेल्या एका हातभट्टीच्या धंदयावर प्रभावी छापा टाकला. त्यामध्ये त्यांनी ७० लिटर दारु जप्त करुन, १५०० लिटर रसायन, त्याशिवाय दारु गाळण्याचे लोखंडी बॅरल, ॲल्युमिनिअमचा पाईप इ.साहित्य, एकुण ८६,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल जागीच ताब्यात घेवुन नष्ट केला. आणि या अनुषंगाने लोणीकंद पोलीस स्टेशनला दिनांक २९/०६/२०२३ रोजी गु.र.क्र.५०२/२३ कलम महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (फ) (ब) (क),८३ प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयात हातभट्टी चालक इसम व त्यास हातभट्टीसाठी लागणा-या मालाचा पुरवठा करणा-या इसमास लोणीकंद पोलीसांनी दि. २९/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आली असुन दाखल गुन्हयातील नमुद दोन्ही आरोपीतांना मा. न्यायालयाने दि. ०३/०७/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि रविंद्र गोडसे हे करीत आहेत.